Publication: M.Times
Date: 15/1/2020
Page: 2
Column: 6-7

महाराष्ट्र टाइम्स
मुंबई । बुधवार, १५ जानेवारी २०२०

# विजेच्या तारांजवळ पतंगबाजी टाळा

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

2/6-7

## वीज कंपनीचे आवाहन, ग्रीड बंद पडण्याची भीती

मकर संक्रातीच्या निमित्ताने होणाऱ्या पतंगबाजीच्यावेळी विजेच्या तारांपासून सावध रहा. विजेचे वहन होणाऱ्या पारेषण तारांजवळ पतंग उडवणे टाळा. अन्यथा मोठ्या अपघातासह ग्रीड बंद पडण्याचीही भीती आहे, असे आवाहन अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड (एईएमएल) या कंपनीने केले आहे.

पतंग उडवताना जवळ विजेच्या तारा असल्यास त्याबाबत जागरूक राहण्याची गरज आहे. मुंबईच्या अनेक भागांतून वीजवितरणाच्या तारांसह विजेचा पुरवठा करणाऱ्या अधिक क्षमतेच्या पारेषण ताराही जातात. या तारांमध्ये पतंग अडकल्यास उच्च दाबामुळे विजेचा धक्का बसून जागीच मृत्यू होण्याची भीती असते.



याबाबत एईएमएलच्या प्रवक्त्यांनी सांगितले की, 'पतंग उडविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मांजामध्ये धातूच्या भुकटीचा उपयोग होतो. त्यामुळे हा मांजा विजेचा सुवाहक असतो. त्यामुळेच तो विजेच्या तारांच्या संपर्कात येणे धोक्याचे असते. वीज पारेषण करणाऱ्या तारांची क्षमता तब्बल दोन लाख २० हजार व्होल्ट असते. त्यामुळे मांजा या तारांच्या जवळून गेला तरी विजेचा प्रवाह तत्काळ आकर्षित होतो.'

### '१९१२२' वर संपर्क साधा

अशा प्रकारे विजेच्या तारांच्या जवळ कोणी पतंग उडवत असल्यास किंवा एखादा मांजा तारेत अडकला असल्याची घटना नजरेस पडल्यास नागरिकांनी '१९१२२' या हेल्पलाइन क्रमांकावर तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन एईएमएलकडून करण्यात आले आहे.